दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/

# वृत्तपत्र टिप्पणी

**मुंबई (दि. ११/१२/२०१३) :**

भारतीय स्पर्धा आयोग (कॉम्पिटिशन कमिशन ऑफ इंडिया - सी.सी.आय.) यांनी दि. ०९ डिसेंबर रोजी दिलेल्या एका महत्वपूर्ण व पथदर्शी आदेशानुसार मे. कोल इंडिया लि. ह्या सरकारी कोळसा कंपनीस सुमारे रु. १७७३ कोटी इतका दंड ठोठावण्यात आलेला आहे. महानिर्मितीने या आयोगासमोर वर्ष २०१२ मध्ये केस क्र. ३ व केस क्र. ११ नुसार सादर केलेल्या याचिकांवर निर्णय देताना स्पर्धा आयोगाने हा आदेश दिला आहे. सातत्याने पाठपुरावा करुन देखील महानिर्मितीला त्रस्त करणाऱ्या कोळसाविषयक अनेक समस्यांवर तोडगा निघत नसल्याने महानिर्मितीने सरतेशेवटी स्पर्धा आयोगाकडे धाव घेतली होती. या याचिकांद्वारे महानिर्मितीतर्फे सादर करण्यात आलेल्या वस्तुस्थितींचा वस्तुनिष्ठ व सांगोपांगी विचार करुन आयोगाच्या मा.श्री. अशोक चावला यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हा आदेश दिला आहे. तसेच या आदेशान्वये इंधन पुरवठा करार सुधारित करणेबाबत तसेच कोळसा तपासणी पध्दतीबाबत (सॅम्पलिंग) मे. कोल इंडिया लि. यांना कालबध्द निर्देश देण्यात आलेले आहेत. योग्य प्रतीचा पुरेसा कोळसा प्राप्त होण्यासाठी दीर्घ काळापासून सुरु असलेल्या महानिर्मितीच्या विधायक प्रयत्नांना राज्यातील वीज ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या या आदेशामुळे निश्चितच चालना मिळालेली आहे.

कोळसा समस्यांमुळे महानिर्मितीच्या औष्णिक संचांच्या कामगिरीवर विपरीत परिणाम झालेला आढळून येत होता. गेल्या काही वर्षांपासून मे. वेस्टर्न कोलफिल्डस् लि. तसेच मे. महानदी कोलफिल्डस् लि. यांचेकडून ज्या प्रतीचा व जितका कोळसा उपलब्ध होईल त्यानुसार वीज उत्पादन करणे महानिर्मितीला क्रमप्राप्त ठरत होते. विविध ग्राहक संघटना तसेच राज्य वीज नियामक आयोग यांचेकडून महानिर्मितीला खालावलेल्या कामगिरीबाबत अनेकदा नाहक टीका सहन करावी लागत होती. यासंबंधी कोळसा समस्येविषयी प्रत्यक्ष वस्तुस्थितीची माहिती वारंवार मांडून देखील महानिर्मितीवर अनेक निराधार आरोप करण्यात येत होते. मात्र वरील आदेशामुळे महानिर्मितीच्या भूमिकेला बळकटी मिळाली असून अशा निराधार आरोपांना परस्पर उत्तर मिळाले आहे. खालावलेल्या कामगिरीमागे कोळसा हे प्रमुख कारण होते, हे या आदेशावरुन सिध्द होते. महत्वाची बाब म्हणजे अन्य वीज कंपन्यांनादेखील कोळसा समस्या त्रस्त करीत असताना त्या पार्श्वभूमीवर स्पर्धा आयोगाकडे धाव घेणारी महानिर्मिती ही देशातील पहिली वीज कंपनी आहे. महानिर्मितीपाठोपाठ एन.टी.पी.सी., गुजरात तसेच अन्य काही वीज कंपन्यांनी आता स्पर्धा आयोगाकडे धाव घेतली आहे.

कोळसा पुरवठादार कंपनीकडून वारंवार होत असलेल्या अन्यायाबाबत, करारातील जाचक अटींबाबत तसेच करारातील अटी व शर्तींचा वारंवार भंग होत असल्यामुळे तसेच कोळसा कंपन्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने महानिर्मितीला सदर याचिका दाखल करणेवाचून तरणोपाय नव्हता. कोळसा समस्येमुळे महानिर्मितीचे अपरिमित आर्थिक नुकसान होत असल्याने साहजिकच अंतिमत: त्याचा भार राज्यातील वीज ग्राहकांवर पडत होता.

सदर याचिकेवर निर्णय देताना मा. राज्य स्पर्धा आयोग ह्यांनी वस्तुस्थितीचा पूर्ण विचार करुन महानिर्मितीच्या दाव्यात तथ्य असल्याचे मान्य करताना मे. कोल इंडिया लि. व तिच्या सहयोगी कंपन्या ह्या आपल्या मक्तेदारीचा गैरवापर करीत आहेत असे निदर्शनास आणले आहे. स्पर्धा आयोगाच्या या वैशिष्ट्यपूर्ण आदेशामुळे वीज क्षेत्रावर निश्चितच दूरगामी परिणाम होणे अपेक्षित आहे.

महानिर्मितीच्या वतीने सदर केस ॲड. श्री. संजय सिंग, दिल्ली यांनी लढविली.

-----------------------------------------------------------------------------------------------

दिनांक : ११/१२/२०१३.

प्रति,

**माननीय संपादक,**

दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत / वाहिनीवर प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**